**नियमित दिवाणी दावा क्र.८७/२०१६**

श्री. सुरेश हिंदुराव मगदुम विरुध्द

श्री. हिंदूराव राघु मगदुम वगैरे.

**नि.२२ खालील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज, वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती आणण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जातील वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा वडिलार्जित शेत व घर मिळकतीच्या वाटपासाठी व मनाईसाठी दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी दावेच्या सरनामेमध्ये प्रतिवादी क्र.५ च्या नांवात बदल झाल्याचे वादींना नुकतेच समजुन आले आहे. सदरची चूक ही टायपिंग दोषामुळे व नजरचुकीने झाली आहे. दावेच्या सरनामेत " प्रतिवादी क्र.५ श्री. सुभाष जिन्नाप्पा भबिरे या नांवास काट देवून त्याठिकाणी प्रतिवादी नं.५ श्री. भरत सुभाष भबिरे, व.व.३०, धंदा शेती, रा. कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर " असे नमुद करण्यास परवानगी मागितली आहे. अर्ज मंजूर केल्यास दावेच्या रचनेत बदल होणार नाही. सदरचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. सदरील दुरुस्ती केलेस अंतिम न्यायदान करणे सुलभ होणार आहे. करीता अर्ज मंजूर करण्यात यावा अशी मागणी वादीने केली आहे.

२. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जाकरीता आपले म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. वादीने दावा दाखल करताना सातबारा उतारा तसेच खरेदीपत्र पाहिले आहे तसेच त्याने त्रयस्थ इसमास प्रतिवादी केले आहे. त्याने हजर होवून कैफियत दिली आहे त्यामुळे त्यास नाहक भुर्दंड सोसावा लागला आहे. वादीने आता दुरुस्तीच्या अर्जाने प्रतिवादी बदलण्याची मागणी केली आहे. त्यामुळे नवीन प्रतिवादी सामील केल्यासारखे होत आहे. करीता प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतच्या अर्जातील प्रस्तावित दुरुस्ती ही अतिशय किरकोळ स्वरुपाची असून ती टंकलेखन दोषाने व नजरचुकीने झालेली चूक दिसून येते. दावा मिळकतीचा सातबारा उतारा पाहिला असता दावा मिळकत ही प्रतिवादी श्री. सुभाष जिन्नाप्पा भबिरे याने खरेदी घेतली नसून ती त्याचा मुलगा श्री. भरत सुभाष भबिरे याने खरेदी केल्याचे दिसून येते. प्रस्तावित दुरुस्ती

दाव्यामध्ये केल्यास प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादीस वादीला उलटतपास करण्याची संधी राहील. त्याचप्रमाणे सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याच्या स्वरुपात कुठलाही बदल होत असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणवत्तेवर चालविण्यास मदत होईल. सबब अर्ज कॉस्टवर मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज ३००/– रुपये कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तावित दुरुस्ती वादीने हा आदेश झाल्यापासून तात्काळ चौदा दिवसांचे आत वादपत्रात करुन घ्यावी.

३. अर्ज वरीलप्रमाणे निकाली काढण्यात येतो.

सही/-

दिनांक – १८ ऑगष्ट, २०१७

( आर. ए. माळाकोळीकर )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कुरुंदवाड.